# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
# बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

## रामाआ- तक्रार क्र. बीएम- ४११/२०१९

**तक्रारकर्ताश्री. खान परवेज अजीज अहमद**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी,जी/उत्तर विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, वरिष्ठ वसाहत अधिकारी, जी/उत्तर विभाग
यांचे कार्यालय, झोपडपट्टी सुधारणा खाते, तळ मजला,
महानगरपालिका इमारत, हरिश्चंद्र येलवे मार्ग,.
दादर, मुंबई -४०० ०२८

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त**
बृहन्मुंबई महानगरपालिका, वरिष्ठ वसाहत अधिकारी, जी/उत्तर विभाग
यांचे कार्यालय, झोपडपट्टी सुधारणा खाते, तळ मजला,
महानगरपालिका इमारत, हरिश्चंद्र येलवे मार्ग,
दादर, मुंबई -४०० ०२८

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ०६.११.२०२४**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. मु.मा.आ. नों.क्र. ८०९/२०१८ रा.मा.आ.अपील क्र. २६३/२०१९ प्रकरणी आयोगाने दि. १२.०७.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

"जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना उपलब्ध माहिती १५ दिवसांत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(६) अन्वये निशुल्क पुरवावी. या आदेशासह अपील निकाली काढण्यात येत आहे."

उक्त आदेशानुषंगाने तक्रारकर्ता यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि. २७.०८.२०१९ रोजी आयोगासमोर तक्रार अर्ज दाखल केला. सदर तक्रारीवर जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी, जी/ उत्तर विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/ उत्तर विभाग यांचे कार्यालय, मुंबई यांच्याकडून आयोगाने दि. १६.०९.२०१९ च्या पत्रानुसार अहवाल मागविण्यात आला. त्याअनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी, जी/ उत्तर विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/ उत्तर विभाग यांचे कार्यालय, मुंबई यांनी त्यांचा अहवाल दि. ०४.१०.२०१९ आयोगास सादर केला. जन माहिती अधिकारी यांनी अहवालात नमुद केले की, श्री. खान परवेज अझीझ अहमद यांना पोस्टाने पाठविलेल्या माहितीच्या प्रती उलट टपाली या कार्यालयात परत आलेल्या आहेत.

..२/-

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता व जन माहिती अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी आयोगास निवेदन केले की, आयोगाच्या आदेशाच्या अनुषंगाने तक्रारकर्ता यांना पोस्टाने पाठविलेल्या माहितीच्या प्रती उलट टपाली या कार्यालयात परत आल्या होत्या म्हणून सदर माहितीच्या प्रती आयोगाच्या कार्यालयास दि. ०४.१०.२०१९ रोजीच्या अहवालासोबत सादर करण्यात आल्या आहेत.

सदर माहितीच्या प्रती आयोगाच्या अभिलेखावर उपलब्ध आहेत. त्याची छायांकित प्रत करुन तक्रारकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात आली आणि तक्रारकर्ता यांनी त्यांना माहिती मिळाली आहे असे त्यांच्या स्वाक्षरीसह आयोगास सादर केले आहे.

या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, तक्रारकर्ता यांना माहिती देण्यात आली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

7-11-2024

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : ०७.११.२०२४**

State Information Commission
Greater Mumbai